# मेट्रो ३ च्या विद्युत यांत्रिक प्रणालीसाठी करार पूर्ण

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेच्या प्रकल्पाचा कारडेपो आणि आरे स्थानक यांच्या विद्युत यांत्रिक प्रणालीसाठी ब्ल्यू स्टार कंपनीसोबत करार पूर्ण करण्यात आला आहे. या करारांतर्गत अत्याधुनिक विद्युत यंत्रणा, वातानुकूल यंत्रणा, अग्निशमन यंत्रणा, विद्युत ओव्हरहेड क्रेन,



प्लम्बिंग, व्हेंटिलेशन, एअर कंप्रेसर प्रणाली आणि इमारत व्यवस्थापन यंत्रणा निर्माण करण्यासाठी तंत्रशुद्ध तसेच व्यापक दृष्टिकोनातून एमएमआरसीने आखणी केली आहे. याबाबत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले की, आरे स्थानक आणि डेपोची विद्युत यांत्रिक प्रणाली तंत्रशुदध असणे मुंबई मेट्रो ३ प्रकल्पासाठी आवश्यक आहे. अद्ययावत यंत्रणेची अंमलबजावणी करून सुरक्षेच्या दृष्टीने अधिक जागरूक राहणे आमचे ध्येय असल्याचे सांगत प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असेही भिडे यांनी स्पष्ट केले आहे.